# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in


जा. क्र.तंशिविकापु/विवि/औनिशा/पदविका/पदवी/ २०१०-२०११/ १६८२ दिनांक :- 8 MAR 2011

प्रति,

प्राचार्य,
अशासकीय विनाअनुदानित अभियांत्रिकी पदवी/पदविका संस्था,

विषय :- २००६-०७ ते २००९-१० पर्यंत प्राप्त झालेल्या ईबीसी सवलतीचे रक्कमेचे लेखा परीक्षण (ऑडीट) करुन घेणेबाबत.

संदर्भ :- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.टीईएम/२००७/(४९६/०७)/ताशि-१ दि.१०/१२/०७.
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण म.रा.मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.१५/अर्थसं/आमावि-लेखापरिक्ष्ंण/१०-११/२६७ दि.२३/०९/१०.
३. या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/विवि/ईबीसी/ऑडीट/२०१०-११/००१/१/१/२०११.

उपरोक्त संदर्भाकिंत शासन निर्णयामधील नमुद केलेल्या कार्यपध्दतीच्या अनुषगांने खाजगी अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्या मागास लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या रक्कमेची ५० टक्के प्रतिपूर्ती करण्याबाबत शासनाने मंजूर केलेल्या वित्तीय वर्ष २००७ ते २००९-१० मधील प्राप्त झ्ालेल्या अनुदानाचे लेखा परीक्ष्ंण करुन घेणेबाबत वारंवार या कार्यालयाच्या संकेत स्थळावरुन पत्र प्रसिध्द करुन अद्यापही काही संस्थांनी लेखा परीक्षण करुन न घेतल्याचे निदर्शनास आले आहे. तरी ज्या संस्थांचे ईबीसी ऑडीट २००६-०७ ते २००९-१० पर्यंत या कालावधीतील झालेले नाही अशा संस्थ्ांनी दिनांक ०९/०३/२०११ ते ११/०३/२०११ या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत लेखा परीक्षण करण्यासाठी खालील कागदपत्रांसह उपस्थित रहावे. अन्यथा शैक्षणिक वर्ष २००९-१० व २०१० -११ या वर्षाची ईबीसी सवलतीची रक्कम या कार्यालयाकडून मंजूर करण्यांत येणार नाही याची कृपया गांभीर्याने दखल घ्यावी .

संस्थ्ांनी सोबत आणावयाची कागदपत्रे

१) शिक्षण शुल्क निश्चितीचे पत्र त्या त्या वर्षाची

२) मिळालेल्या अनुदानाची रक्कम व ते विद्यार्थ्यांना वितरीत केल्याचे ॲक्वीटन्स रोल

३) गुणवत्ता यादी त्या त्या वर्षाची

४) ज्या विद्यार्थ्यांना ईबीसी मंजूर करण्यांत आलेली आहे. अशा विद्यार्थ्यांचा मेरीटलिस्ट वरील अनुक्रमांक ॲक्वीटन्स रोलवर नमुद करण्यांत यावा.

(डी.एन. शिंगाडे )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :- श्री. शिंदे प्राग्रॅमर यांना सदरचे पत्र संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी